प्रस्तावना :- शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (बी.एड व डी. एड् कोर्स वगळून) सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १२ मार्च, २००७ च्या शासन निर्णयान्वये घेतला. त्याअनुषंगाने सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात सदर निर्णय लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- राज्यातील शासकीय, अनुदानित व शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (बी.एड व डी एड् कोर्स वगळून) सन २००७-०८ या वर्षी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची १०० % प्रतिपूर्ती करण्यास खालील अटींवर तसेच इतर मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क, परिक्षा शुल्काच्या १०% दराने प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

ROCA/H-2716(2000-3-2008)-1

Scanned by CamScanner

२. सदर योजना सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षा... घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांस... वर्षापुरती लागू राहील.

३. या योजनेचा लाभ याचकीय,अनुदानित व विनाअनुदानित तसेच कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी... खाली सुरू केलेल्या अभ्यासक्रमांसाठी त्या समोर नमूद केलेल्या परीक्षेद्वारा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना... राहील.

अ) अभियांत्रिकी अभ्यासक्रम -- शासनाच्या सामायिक प्रवेश परीक्षेद्वारा (CET) प्रवेश घेतलेल्या तसेच... संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या (Institutional Level Quota) परीक्षेद्वारा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना... लागू राहील.

ब) आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम -- शासनाच्या सामायिक प्रवेश परीक्षेद्वारा (CET) प्रवेश घेतलेल्या तसेच... खाजगी विना अनुदानित महाविद्यालयांच्या असोसिएशनद्वारा आयोजित सामायिक परीक्षेद्वारा (Association CET)... परीक्षेद्वारा आणि इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यासक्रमांसाठी थेट प्रवेश घेतलेल्या... विद्यार्थ्यांना लागू राहील. एकूण प्रवेश क्षमतेच्या १५ % जागा अनिवासी भारतीयांकरिता राखून ठेवलेल्या जागांत... सदर व्यवस्थापन कोट्यामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांस या योजनेचा लाभ कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध... राहणार नाही. तसेच अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

क) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय अभ्यासक्रम-- काही अभ्यासक्रमांसाठी... शासनाची सामायिक प्रवेश परीक्षा (CET) घेण्यात येत नाही. त्यांचेसाठी इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारावर... अशा अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

४. आपल्याला लाभ न घेता, मुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या... जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीसुध्दा सदरची योजना लागू राहील. त्यासाठी... त्यासाठी जातीच्या वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता राहील. तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास... प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाना नॉन क्रिमिलेअरची अट लागू राहिल.

५. सन २००६-०७ मध्ये प्रवेश घेणा-या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास... प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वरील परिच्छेद ३ व ४ मधील अटी लागू राहतील.

६. सन २००६-०५ पूर्वी वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या... जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची रक्कम खालीलप्रमाणे देय राहिल.

अ) विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी संलग्न... आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमासाठी सन २००३-०४ या वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासन निर्णय क्रमांक... विजाजि-२००३/ प्र.क्र.४४०/मावक-३ दिनांक १ फेब्रुवारी, २००५ नुसार शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या... दरानुसार १०० % शिक्षण शुल्काची रक्कम देय राहिल.

ब) विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी संलग्न... आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमासाठी सन २००४-०५ व २००५-०६ या वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी... क्र. आविजा-२००६/प्र.क्र.५०/मावक-३ दिनांक २१ मार्च, २००६ नुसार शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या... दरानुसार १०० % शिक्षण शुल्काची रक्कम देय राहील.

क) विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित तंत्रविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी संलग्न... अभियांत्रिकी व इतर अभ्यासक्रमासाठी शासकीय दराने शिक्षण शुल्क देय राहील.

Scanned by CamScanner

सन २००६-०७ पूर्वी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची रक्कम खालीलप्रमाणे देय राहील.

अ) विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमाशी संलग्न आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमासाठी सन २००३-०४ या वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासन निर्णय क्रमांक विजाक-२००३/ प्र.क्र.४४०/मावक-३ दिनांक ९ फेब्रुवारी, २००५ नुसार विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी ठराविक रक्कम निश्चित केली आहे. त्यानुसार शिक्षण शुल्काची रक्कम देय राहील.

ब) विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमाशी संलग्न आरोग्यविज्ञान अभ्यासक्रमासाठी सन २००४-०५ व २००५-०६ या वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासन क्र.आविअ-२००६/प्र.क्र.५०/मावक-३ दिनांक २१ मार्च, २००६ नुसार विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी ठराविक रक्कम निश्चित केली आहे. त्यानुसार शिक्षण शुल्काची रक्कम देय राहील.

क) सन २००६-०७ पूर्वी प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फक्त वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी ही योजना लागू आहे. अभियांत्रिकी व इतर अभ्यासक्रमांसाठी लागू राहणार नाही.

८. हे आदेश शासकीय, अनुदानित आणि खाजगी मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २००७-२००८ या वर्षी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय जातीच्या विद्यार्थ्यांना त्या वर्षापुरतेच लागू राहतील.

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे

पदविका	पदवी	पदव्युत्तर पदवी
अभियांत्रिकी	अभियांत्रिकी	एम.बी.ए.
औषधनिर्माण शास्त्र	औषधनिर्माण शास्त्र	एम.सी.ए.
एच.एम.सी.टी	एच.एम.सी.टी.	--
--	वास्तुशास्त्र	--

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस्.सी. (जैवतंत्रज्ञान)

९. ही योजना अनिवासी भारतीयांकरिता (NRI) कोट्यातून व्यवस्थापनामार्फत देण्यात येणा-या प्रवेशार्थीस व अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सवलत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू रहाणार नाही. परंतु एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या [Allow to Keep Terms (ATKT) मिळालेल्या] विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

१०. यासाठी होणारा खर्च विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयासाठी असलेल्या शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रदाने या योजनेसाठी असलेल्या प्रधान शिर्षाखाली सन २००७-०८ या आर्थिक वर्षात दिलेल्या अर्थसंकल्पीय तरतूद, पुरवणी मागणी आणि सुधारीत अंदाजातून उपलब्ध करून दिलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

Scanned by CamScanner

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध केला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०१२६१७२०२५०१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दे.त्र. कुमावत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति-
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री कृषी व पदुम यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, (विमुक्त जाती, भटक्या जमाती यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे स्वीय सहाय्यक.
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव,कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, महाराष्ट्र राज्य, पुणे (पाच प्रती)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/ अधिवक्ता व लेखाधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
नियोजन विभाग, (१४३१/१४११), मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, (व्यय १५/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-५), मंत्रालय, मुंबई
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडल सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (दोन प्रती)
सामाजिक न्याय विभागातील सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
निवड नस्ती सोबत दे.

M-2516 20.

Scanned by CamScanner

(25) (7) 95

विशेष भागात प्रकल्पांच्या वेतनश्रेणीत शैक्षणिक सवलती लागू करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक: झोसी १०९५/प्र.क्र.९१/मावक-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक: २४ ऑक्टोबर, १९९६.

वाचा: १) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्रमांक:झोसी १०९५/प्र.क्र.२३६/मावक-२, दिनांक १२ जून, १९९५.

शासन निर्णय: वरील शासन निर्णयान्वये राज्यातील समाजाच्या दृष्टीने मागास प्रवर्गात समावेश करुन त्या जाती/जमातींना शैक्षणिक सवलती देण्याबाबत आदेश शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या सवलतींच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक वस्तुस्थितीचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आता वरील ३ (अ) या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेल्या शैक्षणिक सवलती लागू करण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. ही योजना सन १९९५-९६ पासून शैक्षणिक वर्षापासून अंमलात येईल.

३. अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांतील असलेल्या सर्व शैक्षणिक सवलती इतर विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात येत आहेत.

४. विशेष मागास प्रवर्गात ज्यांचेही समावेश आत केला आहे, त्या जाती वेळोवेळी जमातींची शासनाकडून प्रसिद्ध केली जातात. केल्या जातील व त्यांना ह्या शैक्षणिक सवलती अनुज्ञेय राहतील असे शासन आदेश निर्गमित करण्यात येतील, परंतु, जमातींच्या विद्यार्थ्यांना ह्या शैक्षणिक सवलती ह्या आदेशात नमूद केलेल्या वेतनश्रेणीपासून आणखी असे आदेश निर्गमित केलेल्या वेतनश्रेणीपासून लागू राहतील व त्या जातींना, जमाती म्हणून वगळण्यात येतील तेव्हा त्यांना शैक्षणिक सवलती लागू राहणार नाहीत, असे शासन आदेश निर्गमित करण्यात आले तर ह्या शैक्षणिक सवलती त्या जातींना, जमातीला त्या वेतनश्रेणीपासून लागू राहणार नाहीत.

५. या योजनेवर होणारा सर्व खर्च मागणी क्रमांक एन-७, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गाचे कल्याण-०२-मागासवर्गाचे कल्याण-२७७-शिक्षण-(२) शैक्षणिक योजनांतर्गत योजना-००-शैक्षणिक योजना-(०१) विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शासकीय व निमशासकीय संस्थांमध्ये शिक्षण-(अ) शासकीय संस्थांमध्ये शिक्षण (२१) जिल्हा परिषदांना अनुदाने-(अ) शासकीय संस्थांमध्ये शिक्षण-महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आर्थिक, १९६१च्या कलम, १८३ अन्वये सहायक अनुदाने" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन ते भागविण्यात

..२..

Scanned by CamScanner

अर्थसंकल्पात करण्यात येणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७१९/व्यय-११, दिनांक ५.१०.१९९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ब. वि. सोनावणे

[ब. वि. सोनावणे.]

उपसचिव, समाज कल्याण.

प्रति:

संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, पुणे.
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व शिक्षण निरीक्षक, जिल्हा परिषद.
महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
शिक्षण व सेवा योजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०००३२.
संचालक, समाज कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
निवड नस्ती, का.मावक-२, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र. इबीसी -२०१६/प्र.क्र. २२१ /शिक्षण-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३१ मार्च, २०१६.

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम -२०१५/ प्र. क्र. २१९/तांशि-४, दिनांक ३१ मार्च, २०१६.

प्रस्तावना :

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखालील मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून घेतलेला आहे. सदरहू निर्णय शैक्षणिक वर्ष २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये कायम ठेवण्यात आलेला आहे. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सुरु ठेवण्याबाबतच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्यात आली असून त्यासंदर्भातील उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्यास खालीलप्रमाणे शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१. प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे अंमलबजावणी करण्यात यावी.

२. सदर योजनेच्या अंमलबजावणीस दरवर्षी मंत्रिमंडळाची मान्यता न घेता धोरण म्हणून सदर योजनेस मान्यता देण्यात यावी.

३.सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील सुधारीत पद्धतीचा पुढील शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी विभागाने सविस्तर आढावा घ्यावा.

४. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक असलेला निधी प्रत्येक वित्तीय वर्षी अर्थसंकल्पीत करुन उपलब्ध करण्यात यावा.

५. सदर योजनेचे मूळ निकष न बदलता अंमलबजावणीत सुधारणा करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांस वित्त विभागाच्या सल्ल्याने प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्यास खालील सुधारित अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात येत आहे-

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग) :- असोशिएशन ऑफ मॅनेजमेंट्स ऑफ अनएडेड प्रायव्हेट मेडीकल अँड डेंटल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास राबविलेल्या प्रवेश प्रक्रियेतून अथवा शासनाच्या सामाईक प्रवेश परीक्षाद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यन्तच्या कालावधीसाठी लागू राहील. मात्र सदर प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्था स्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत- राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतनांसमवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविली जाणारी व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू राहिल.

या योजनेमध्ये खालील अभ्यासक्रमांचा समावेश राहील :-

पदविका	पदवी	पदव्युत्तर पदवी
अभियांत्रिकी	अभियांत्रिकी	एम.बी.ए./एम.एम.एस.
औषधनिर्माणशास्त्र	औषधनिर्माणशास्त्र	एम.सी.ए.
एचएमसीटी	एचएमसीटी	--
--	वास्तुशास्त्र	--

क) **कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग :-** राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित विद्यालये/महाविद्यालयांमधील शासकीय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती पुढील अभ्यासक्रमांसाठी ही प्रतिपूर्ती योजना लागू राहील.

कृषी विद्यालये (पदविका)
दुग्ध व्यवसाय विकास (पदविका)
कृषी व संलग्न विषयांची महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)
कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)
कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)

ड) महाराष्ट्र शासनाच्या बी.एड व डी.एड. अभ्यासक्रमाच्या प्रतिपूर्तीसाठी पूर्वीचे आदेश लागू राहतील. सदर अभ्यासक्रमांची प्रतिपूर्ती राज्य शासनाच्या अनुक्रमे उच्च व तंत्रशिक्षण विभाग व शालेय शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे अनुज्ञेय राहील.

२) सदरहू योजना सन २०१५-१६ पासून पुढे खालील अटी व शर्तीनुसार लागू राहतील :-

(१) राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची ५० टक्के प्रतिपूर्ती त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यन्त अनुज्ञेय राहील.

(२) विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ४.५० लाखाच्या मर्यादेत असावे. या योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरिता मिळाल्यानंतर ही सवलत त्यांचा अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यन्त अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुस-या वर्षापासून दरवर्षी उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(३) आरक्षणाचा लाभ न घेता गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सुध्दा सदर योजना लागू राहील.

(४) उपरोक्त योजना फक्त शासकीय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच लागू राहील.

(५) तंत्रशिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी या योजनेचा लाभ ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थ्यांना लागू राहील. मात्र सदर प्रवेश पक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

(६) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषध निर्माण शास्त्र तसेच पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी जर शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला असेल तरच त्यांना प्रतिपूर्ती योजनेचा लाभ होईल. मात्र सदर प्रवेश पक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

(७) सदरहू योजनेचा लाभ एआयईईई कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू राहील.

(८) सदर योजना ही खाजगी अभिमत विद्यापीठ अथवा खाजगी स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

(९)सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने निश्चित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केवळ महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणा-या विदयार्थ्यांसाठीच मर्यादित राहिल.

(१०)शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. म्हणजेच अन्य योजनेच्या माध्यमातुन विद्यार्थी कोणत्याही शिष्यवृत्ती / शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ घेत असल्यास तो विद्यार्थी या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र असणार नाही.

(११)आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम, उच्च व तंत्रशिक्षण विभागातंर्गत येणारे अभ्याक्रम व कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत येणारे अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या लाभार्थी विद्यार्थ्याने नियमितपणे महाविद्यालया / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे आवश्यक राहिल व प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाले नसल्यास संबंधित विदयार्थी व शैक्षणिक संस्थेने तशी शिफारस केल्यानंतर संबंधीत सक्षम अधिकारी यांनी तसे प्रमाणित करणे आवश्यक राहिल.

(१२)पात्र लाभार्थी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतल्यानंतर एखादया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरिता सदर योजनेंतर्गत सदर विद्यार्थी लाभ मिळण्यास अपात्र राहिल.

तथापि, तदनंतर पुनश्च: त्या सत्र/वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: पास (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेतील लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

(१३)परंतु असे पात्र लाभार्थी विदयार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरिता कायमस्वरुपी अपात्र ठरेल.

(१४) लाभार्थी विदयार्थी व संबंधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चूकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेच, त्या विदयार्थ्याला/संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चूकीच्या माहितीच्या आधारे त्यापूर्वी मिळालेल्या लाभाच्या संपूर्ण रकमेची व्याजासह वसूली करण्यात येईल व कोणत्याही योजनेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती/शुल्क प्रतिपूर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही योजनेची अंमलबजावणी करणा-या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल.

(१५) संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमितपणे गैरहजर राहणे इत्यादी स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्याची शुल्क प्रतिपूर्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

(१६) ज्या अभ्यासक्रमाकरिता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास प्रतिपूर्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या प्रतिपूर्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या/तिच्याकडून वसुल केली जाईल.

(१७) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा शैक्षणिक संस्थेस अथवा विद्यार्थ्याच्या पालकांना शासनाच्या विरुध्द करता येणार नाही.

(१८) सदर योजनेच्या लाभाकरिता शासकीय अथवा शासन अनुदानित शैक्षणिक संस्था किंवा शासकीय विदयापीठ वगळून अन्य सर्व खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील पात्र विदयार्थ्यांचे प्रवेश व विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे असलेले शिक्षण शुल्क हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक (प्रवेश व शिक्षण शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ ,मधील तरतूदीनुसार शुल्क नियामक प्राधिकरणाकडून प्रत्येक वर्षी निश्चित करुन अंतिम करणे आवश्यक राहील.

(१९) सदर योजनेंतर्गत पात्र असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जाचा मानांकन प्राप्त करणे (Assesment and Accreditation) आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थांकडून मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन मूल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिताच सदर योजना लागू राहील.

<u>शुल्क प्रतिपूर्तीच्या वितरणाची कार्यपद्धती:-</u>

(०१) सदर योजनेतंर्गत शैक्षणिक संस्थांमधील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या पात्र लाभार्थींचे अर्ज संगणकीय ऑनलाईन प्रणालीद्वारे स्विकारण्यात यावे.

(०२) विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता निश्चित केलेल्या त्याच्या कुटुंबाची (दोन्ही पालकांची एकत्र) उत्पन्न मर्यादा ही सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केल्याची खातरजमा करणे आवश्यक असून उत्पन्न प्रमाणपत्र हे किमान संबंधित तहसिलदार यांचे असावे.

(०३) प्रत्येक लाभार्थी विदयार्थ्याचा आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांक नमूद करुन संबंधित विद्यार्थी प्रत्येक वर्षाच्या प्रथम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षेस बसला असल्याबाबत संगणकीय प्रणालीव्दारे खातरजमा करुन त्या विदयार्थ्याची सर्व माहिती शैक्षणिक संस्थेने ऑनलाईन स्वरुपात प्रमाणित करुन ऑनलाईन अर्ज सक्षम अधिका-याकडे सादर करणे आवश्यक राहिल.

(०४) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थी हा संबंधित शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विद्यार्थ्यांची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीद्वारे पडताळणी करणे आवश्यक असेल.

(०५) सक्षम प्राधिका-यास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधील विदयार्थ्यांची सर्व माहिती व त्यास दिलेला प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरणाद्वारे वैध ठरविण्यात आल्याची पडताळणी करावी.

(०६) पात्र विद्यार्थ्यांची माहिती आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांकाशी संबंधित शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांचेकडील अथवा अन्य उपलब्ध व्यक्तिगत माहितीशी संलग्नीत झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी प्रत्यक्षात शैक्षणिक संस्थेत शिकत असल्याची आणि शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राच्या परीक्षेस बसला असेल अशा व केवळ उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तींची पूर्तता करत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनाच सदर योजनेतील लाभासाठी पात्र समजण्यात येईल.

(०७) ज्या अभ्यासक्रमांना सत्र परीक्षा पध्दती लागू नाही, अशा अभ्यासक्रमाकरीता संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरण व संबंधित विद्यापीठाने निश्चित केल्यानंतर विद्यापीठाच्या पटावर नोंदविण्यात आलेला नोंदणी क्रमांक तपासून संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या पात्र विदयार्थ्यांला व सहा महिन्याचे पट पडताळून त्याला प्रमाणपत्र दिल्यावर लाभासाठी निश्चित करण्यात येईल. संस्थेने खोटे प्रमाणपत्र दिल्यास संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(०८) अशा पात्र विदयार्थ्यांची विहित मर्यादेतील प्रतिपूर्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून ही थेट स्वरुपात संबंधित शिक्षण संस्थेला त्यांच्या बँक खात्यात ECS द्वारे प्रतिपूर्ती करणे आवश्यक असेल.

(०९) वरीलप्रमाणे पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केल्यानंतर दरवर्षी अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी ही समाजकल्याण आयुक्तालय व विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास वर्ग कल्याण संचालनालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

(१०) तसेच सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांपोटी शासनाकडून संबंधित शैक्षणिक संस्थांना अदा करण्यात येणाऱ्या शुल्क प्रतिपूर्तीबाबत विविध विभागांच्या अखत्यारीतील सर्व सक्षम प्राधिकारी किंवा नेमून दिलेल्या त्यांच्या प्रतिनिधीद्वारे वेळोवेळी दरवर्षी लाभार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व उपस्थिती बाबत खात्री करावी. त्यासाठी आवश्यक त्या सूचना वेळापत्रकासह सक्षम प्राधिकारी व संनियंत्रण अधिकाऱ्यांनी निर्गमित करावीत. तसेच या योजनेतील त्रुटी संदर्भातील निरीक्षण व फलनिष्पत्तीचा अहवाल सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत शासनास न चुकता वेळोवेळी सादर करणे अनिवार्य असेल.

यावर होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा :-

अ) मागणी क्रमांक एन-३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०४)(२०) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षणासाठी शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने (विघयो) (२२२५ ३८०५) (योजनांतर्गत), ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने

ब) मागणी क्रमांक एन-३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- (०२) शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (०२)(१७) राज्यातील इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी, परीक्षा फी प्रदाने (२२२५ ३२३३) (योजनांतर्गत), ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने

क) मागणी क्रमांक एन-३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- (०२) शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (०२)(०४) शिक्षण फी, परीक्षा फी प्रदाने (२२२५ ०८०६) (योजनेतर), ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने

ड) मागणी क्रमांक एन-३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- (०२) शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (०२)(१४) विशेष मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृती/शिक्षण फी, परीक्षा फी प्रदाने (२२२५ २५९६) (योजनेतर), ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३३११६२९१७५२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uttam Shivram Lonare

Digitally signed by Uttam Shivram Lonare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Uttam Shivram Lonare
Date: 2016.04.01 16:28:05 +05'30'

(उ.शि.लोणारे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१)मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२)मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३)मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा.मंत्री, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
७) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
८)मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९)अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०)अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११)अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२)अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३)प्रधान सचिव (पदुम), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व विशेष मागास वर्ग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६)संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७)संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१८)महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
१९)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२०)महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२१)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२)सर्व प्रादेशिक उपायुक्त/सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग,
२२)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२३)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२४) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१४/अर्थ-५), मंत्रालय, मुंबई.
२५) कक्ष अधिकारी, विधानमंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२६) कक्ष अधिकारी, विधानमंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२७)निवड नस्ती (कार्यासन शिक्षण-१).

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती विमुक्त जाती भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - इबीसी-२०११/प्र.क्र.१६४/शिक्षण -१
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ फेब्रुवारी, २०१२.

प्रस्तावना- शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,कृषी विभाग व पशुसंवर्धन दुगधव्यवसाय आणि मत्सव्यवसाय विभाग या विभागाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती,विशेष मागस प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना फी प्रतिपूर्ती करण्याबाबत बाब शासनाच्या विचाराधिन होती.त्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय - राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०११-१२ या वर्षी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग) प्रथम वर्षास असोशिएशन ऑफ मॅनेजमेंटस् ऑफ अनएडेड प्रायव्हेट मेडीकल अँड डेंटल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांनी (आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास ज्या सामाईक प्रवेश परीक्षाव्दारे त्यांना प्रवेश मिळाला) राबविलेल्या प्रवेश प्रक्रीयेतून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यतच्या कालावधीसाठी लागू राहील.

ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे अभ्यासक्रम

पदविका	पदवी	पदव्युत्तर पदवी
अभियांत्रिकी	अभियांत्रिकी	एम.बी.ए.
औषधनिर्माण शास्त्र	औषधनिर्माण शास्त्र	एम.सी.ए.
एच.एम.सी.टी.	एच.एम.सी.टी.	--
--	वास्तुशास्त्र	--

Scanned by CamScanner

क) **कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत असणारे अभ्यासक्रम**

कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत राज्यातील चारही कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित अभ्यासक्रतासाठी शासकीय कोटयातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती खालील अभ्यासक्रमासाठी ही योजना लागू राहील.

कृषि विद्यालय (पदविका,)

कृषि व सलंग्न विषयाची महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)

कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय (पदवी व पदव्युत्तर)

कृषि अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय (पदवी व पदव्युत्तर)

सदरहू योजना सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात राबविण्यासाठी खालील अटी व शर्तीनुसार लागू राहतील.

शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीचे सदर धोरण हे सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाकरिता कालावधीसाठी लागू राहील.

१. राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची १००% प्रतिपूर्ती करणे ही त्या वर्षापूरती लागू राहील.

२. विमुक्त जाती भटक्या जमाती,विशेष मागस प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न क्रिमीलेअरच्या मर्यादेत असावे. (सध्या रुपये ४.५० लाख आहे.)

३. सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची १००% प्रतिपूर्ती व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची ५०% प्रतिपूर्ती ही त्या वर्षापूरती लागू राहील.

४. आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठीसुद्धा सदरची योजना लागू राहील.

५. उपरोक्त योजना फक्त शासकीय कोटयातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच लागू राहील.

६. तंत्र शिक्षणाशी निगडीत पदविका पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थ्यांना लागू राहिल.

Scanned by CamScanner

७. थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी जर शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला असेल तरच त्यांना या प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळेल.

८. अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ही सवलत लागू राहाणार नाही.

९. अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहणार नाही.

१०. ही सवलत एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात ए.टी.के.टी.द्वारे प्रवेश घेतलेल्या [Allowed To Keep Term (A.T.K.T.) मिळालेल्या] विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

११. **<u>या पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून यापुढील काळात या शासन निर्णयाप्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी.</u>**

१२. यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-३ २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०२) (१७) राज्यातील इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी व परीक्षा फी -(विघयो) (०४) (२०) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने, (२२२५ ३८० ५), ३४ शिष्यवृत्त्या/-विद्यावेतने " या लेखाशीर्षाखाली सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

१३. यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-३ - २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०३-मागासवर्गाचे कल्याण, २७७-शिक्षण,(०२) (१७) राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने, (२२२५ ३२३३) ३४ शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने " या लेखाशीर्षाखाली सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

१४. यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-३ - २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, -०३-मागासवर्गाचे कल्याण,, २७७-शिक्षण, (०२) (०४) शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने, (२२२५ ०८-०६), ३४ शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने " या लेखाशीर्षाखाली सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

१५. यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-३ - २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०३-मागासवर्गाचे कल्याण, २७७-शिक्षण, (०२) (१४) विशेष मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने, (२२२५ २५९६), ३४ शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने " या लेखाशीर्षाखाली सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

Scanned by CamScanner

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २०१२०२०१०५४६३८२३००५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दिनेश वाघमारे)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री,कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री,सा.न्या.यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
निवासी लेखा परीक्षक, मुंबई/अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग, (व्यय १४/अर्थसंकल्प-५),मंत्रालय,मुंबई
कक्ष अधिकारी, विधानमंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती (ड-४), १५ वा मजला, विधानभवन, मुंबई - ४०० ०३२. (५ प्रतीसह)
निवड नस्ती, मावक २

Scanned by CamScanner

दिनांक- १५/१०/०३

राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी व परीक्षा फी सवलत देणे.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग.
शासन निर्णय, क्रमांक:इमाव-२००३/प्र.क्र.२०३/मावक-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ६ ऑक्टोबर, २००३

प्रस्तावना :- केंद्रशासनाने इतर मागासवर्गासाठी १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेनुसार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना सन १९९८-९९ पासून लागू केली आहे. त्या अनुषंगाने राज्यात अनुसूचित जाती/विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गांना राज्यात लागू करण्यात आलेल्या शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्तीच्या धर्तीवर इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: इमाव-२००२/ प्र.क्र.४१४/मावक-३, दि.२९ मे, २००३ अन्वये सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना राज्यात शिक्षण फी व परीक्षा फी योजना शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्रमांक:इबीसी-१०६८/८३५६७ जे, दि.२४.१२.१९७० अन्वये लागू करण्यात आली आहे. इतर मागासवर्ग प्रवर्गातील जे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र नसतील, त्यांना सदर योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :- राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या शालांत परिक्षोत्तर (मॅट्रीकोत्तर) शिक्षण फी व परीक्षा फी योजनेच्या धर्तीवर राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर (मॅट्रीकोत्तर) शिक्षण फी व परीक्षा फी माफी सवलतीची योजना सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यात इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यात आलेली सदर योजना ही, ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न क्रीमीलेअरच्या मर्यादेत असेल अशा इतर मागासवर्ग पालकांच्या पाल्यांना लागू राहील. तसेच या योजनेच्या अटी व शर्ती ह्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गांसाठी शालांत परिक्षोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी योजने अंतर्गत लागू असलेल्या अटी व शर्तीप्रमाणेच रहातील.

३. इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी वरीलप्रमाणे लागू करण्यात आलेली शालांत परिक्षोत्तर (मॅट्रीकोत्तर) शिक्षण फी व परीक्षा फी सवलत योजना शासकीय व अनुदानित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लागू राहील.

४. यासाठी संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

या बाबीवर होणारा खर्च "२२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०३-मागासवर्गीयांचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (राज्य योजनांतर्गत योजना) (०२) (२७) राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी व परीक्षा फी माफी प्रदाने" (२२२५ ३२३ ३) - ४०-शिष्यवृत्त्या व विद्यावेतने-मागणी क्र.एन-४ या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा त्या-त्या वित्तीय वर्षाच्या मंजूर तरतुदीमधून भागविण्यातच्या.

Scanned by CamScanner

...शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्याचा अनौपचारिक संदर्भ क्र. ...
दि. १६ ऑक्टोबर, २००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वै.अ.पारकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (विजाभज) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (समाजकल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (विजाभज) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (समाजकल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण यांचे कार्यालय, पुणे
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदा,
महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र (लेखापरीक्षा) १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व राज्यातील विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख
वित्त विभाग, व्यय १३, अर्थसंकल्प
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, सा.न्या.व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीनमहा मुंबई (त्यांना विनंती की, सदर शासन
ती प्रसिध्दी व्हावी)

निवड यादी/मार्गदर्शक ३.

Scanned by CamScanner

ई-स्कॉलरशिप-भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रदाने योजना- रकमा बँकेमार्फत अदा करणे.....

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्र. ईबीसी-२००९/प्र.क्र.१२२/मावक-३
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई
दिनांक : ११ जानेवारी, २०१०

वाचा : शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. इबीसी-२००३/प्र.क्र.३०१/मावक-२, दिनांक ०१.११.२००३

प्रस्तावना : भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना ही सन १९५९-६० सालापासून केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. या योजनेखाली अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार केंद्र शासनाने विहित केलेल्या दराने निर्वाहभत्ता अदा केला जातो. या बरोबरच शिक्षण फी, परिक्षा फी व कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयांची देय असलेली फीची प्रतिपूर्ती केली जाते. त्याचप्रमाणे शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेल्या दराने व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परिक्षा फीची प्रतिपूर्ती केली जाते.

२. भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेखाली विविध शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालय /महाविद्यालयाकडून शिष्यवृत्तीचे प्रस्ताव जिल्हास्तरावर विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे प्राप्त होतात. सध्याच्या काळात महाविद्यालयाची संख्या व विद्यार्थ्यांची संख्या मोठा प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क प्रस्तावांच्या संख्येत मोठा प्रमाणात वाढ झालेली आहे. या सर्व प्रस्तावांची छाननी करणे, कोषागारांतून रक्कम पारित करणे व धनाकर्षाद्वारे महाविद्यालयाकडे वर्ग करुन त्यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे व शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क रक्कमेचे वाटप करणे या कार्यपद्धतीस विलंब लागतो. सध्याच्या पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप महाविद्यालयामार्फत केले जाते. काही विद्यार्थी महाविद्यालय सोडून गेले असल्यास अशा विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम महाविद्यालयात पडून असते. या योजनेची सर्व प्रक्रिया ही मनुष्य बळाचा वापर करुन केली जात असल्याने या योजनेमध्ये बराच विलंब लागत असून बऱ्याच ठिकाणी अचूकता राहत नाही असे निदर्शनास येत आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे वाटप बँकेमार्फत करण्यात येईल असे निवेदन मा. राष्ट्रपती यांनी संसदेच्या अभिभाषणामये केलेले आहे. त्यानुसार सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वितरण बँकेमार्फत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

Scanned by CamScanner

शासन निर्णय : सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व

शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क या योजनेची रक्कम राष्ट्रीयकृत बॅंकेमार्फत अदा करण्याच्या प्रस्तावास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या सर्व योजनेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत :-

१) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी मुंबई उपनगर यांनी दिनांक ०१/०२/२०१० पासून सर्व महाविद्यालयांना सर्व चेक पाठविणे बंद करुन त्याऐवजी सी.बी.एस./ई.सी.एस. पध्दतीचा अवलंब करावा. त्यासाठी त्यांनी ज्या राष्ट्रीयकृत बँकेत कोअर बँकींग सुविधा उपलब्ध आहे त्या बँकांमध्ये सर्व महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी खाती उघडण्याबाबत कार्यवाही करावी.

२) इतर जिल्हयांच्या विशेष जिल्हा समाजकल्याण अधिका-यांनी त्यांच्या जिल्हयांमध्ये ही योजना दिनांक ०१/०३/२०१० पासून सुरु करावी याकरिता त्यांनी सर्व महाविद्यालयांना दिनांक २५/०२/२०१० पर्यंत ज्या राष्ट्रीयकृत बँकांमध्ये कोअर बँकींग सुविधा उपलब्ध आहे त्या बँकांमध्ये खाती उघडण्याबाबत माहिती दयावी.

३) विद्यार्थ्यांचे खात्यावर सी.बी.एस./ई.सी.एस. पध्दतीद्वारे शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यासाठी पायलट प्रोजेक्ट म्हणून विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई उपनगर, यांनी त्यांच्या जिल्ह्यातील कमीत कमी तीन महाविद्यालयांची निवड करावी. यामधील एक महाविद्यालय हे व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणारे असावे. या तीन महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांचे ज्यामध्ये कोअर बँकींग आणि एस.एम.एस.ची सुविधा उपलब्ध आहे अशा राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्याबाबत कार्यवाही करावी. त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या खात्यात विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी शिष्यवृत्तीची रक्कम जमा करावी.

उर्वरीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याची कार्यवाही महाविद्यालय करतील. सदर महाविद्यालयांनी चेक ऐवजी सी.बी.एस./ई.सी.एस. प्रणालीद्वारे शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात सुरुवात करावी. हे काम ३१/०३/२०१० पुर्वी पुर्ण करावे.

४) सॉफ्टवेअरची वाट न पाहता महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती घेणा-या सर्व विद्यार्थ्यांचे दिनांक ३०/०६/२०१० पर्यंत कोअर बँकींग राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाती उघडावीत. सर्व महाविद्यालयांनी दिनांक ०१/०७/२०१० पासून सी.बी.एस./ई.सी.एस. द्वारे विद्यार्थ्यांच्या बँकखात्यामध्येच शिष्यवृत्तीची रक्कम जमा करावी.

५) ज्या विद्यार्थ्यांचे इतर बँकामध्ये खाते आहेत त्यांनी दिनांक ३०/०६/२०१० पर्यंत कोअर बँकींग सुविधा उपलब्ध आहे अशा राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाती उघडणे आवश्यक आहे. दिनांक

Scanned by CamScanner

०१/०७/२०१० पासून जोपर्यंत याबाबतचे सॉफ्टवेअर तयार होत नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांच्या खात्यावर महाविद्यालयाकडून सी.बी.एस./ई.सी.एस. मार्फत शिष्यवृत्तीचे पैसे जमा करण्यात येतील. सॉफ्टवेअर तयार झाल्यानंतर शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये शिष्यवृत्तीचे पैसे जमा केले जातील.

६) जी राष्ट्रीयकृत बँक विद्यार्थ्यांच्या भ्रमणध्वनीवर शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाल्याचा संदेश (SMS) मोफत पाठवेल तसेच विद्यार्थ्यांचे शुन्य शिलकीचे (झिरो बॅलन्स) खाते उघडण्यास तयार असेल अशाच राष्ट्रीयकृत बँकेस प्राधान्य द्यावे.

३. संचालक, माहिती व जनसंपर्क, संचालनालय यांनी या शासन निर्णयास व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी द्यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब-साईटवर उपलब करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१००१११८३१२५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(राजेश अग्रवाल)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,
मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव
सर्व अमुस/प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, म. रा., मुंबई

Scanned by CamScanner

शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील इतर अभ्यासक्रमासाठी व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासकीय कोटयातून प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - इमाव-२००२/ प्र.क्र. ४१४ /मावक-३
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ मार्च २००७.

वाचा : १) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक - एसएसएन-२१०३/ (५०/०३)/माशि-२, दिनांक २७.५.२००३
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक - युएसजी-२००३/ (८५/०३)/विशि-४, दिनांक २४.९.२००३
३) शासन निर्णय,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग क्रमांक - एमईडी-१००३/ सीआर ५०४/भाग ३/२००३/शिक्षण-२, दिनांक २५.११.०३
४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक - टीइएम-२००३/ (२४९/०३)/तांशि-१, दिनांक १२.५.२००४
५) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:इमाव-२००३/प्र.क्र. २०३/मावक-३, दि. ०६/१०/२००३

प्रस्तावना :- वर ननुद केलेल्या अनु क्र. ५ येथील शासन निर्णयानुसार राज्यातील अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या शालांत परिक्षोत्तर शिक्षण फी परिक्षा फी योजनेच्या धर्तीवर राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षण फी व परिक्षा फी ही योजना सन २००३-०४ हया शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात आली असून ही योजना शासकीय व अनुदानित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लागू करण्यात आली. सदरची योजना विनाअनुदानित महाविद्यालयात शासकीय कोटयातून प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.ए.पै.फौंडेशन विरुध्द कर्नाटक शासन व इतर या प्रकरणी दिनांक ३१.१०.२००२ रोजी दिलेल्या निकालपत्रामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना त्यांच्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्याचे अधिकार संबंधीत खाजगी संस्थांना प्राप्त झाले आहेत. त्यामुळे सन २००३-२००४ पासून मुक्त जागा व मुल्याधारित जागा अशी विभागणी असणारी संकल्पना अस्तित्वात राहीली नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क ठरविण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अध्यक्ष असलेल्या शिक्षण शुल्क समितीची उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक २४.९.२००३ च्या आदेशान्वये स्थापना करण्यात आली आहे. राज्यातील विनाअनुदानित व कायम विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क सदर समितीमार्फत निश्चित करण्यात येते. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी सन २००३-२००४ या वर्षापासून खाजगी महाविद्यालयात शासकीय कोटयातून प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समितीने प्रमाणित केलेल्या दरानुसार शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात यावी व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेगवेगळया

Scanned by CamScanner

अभ्यासक्रमासाठी ठरविलेल्या विशिष्ट दराने शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात यावी अशा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सन २००५-२००६ पर्यंत आरोग्य विज्ञान अभ्यासक्र खाजगी महाविद्यालयात शासकीय कोटयातून प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समितीने प्रमाणित केलेल्या दरानु इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेगवेगळया अभ्यासक्रमासाठी ठरविलेल्या विशिष्ट दराने शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्यात आलेली आहे. खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासकीय कोटयातून प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- शासन मान्यता प्राप्त विनाअनुदानित महाविद्यालयात व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शिक्षण घेत असलेल्या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, राज्यातील शासकीय व अनुदानित महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासन निर्णय दिनांक ०६/१०/२००३ अन्वये लागू केलेली शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क ही योजना सन २००६-०७ या वर्षापासून शासकीय दराने लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (बी.एड व डी एड् कोर्स वगळून) शासकीय कोटयातून सन २००६-२००७ या वर्षी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती करण्यास तसेच इतर मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काच्या ५०% दराने प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. हे आदेश खाजगी मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी व्यवस्थापन कोटयातील प्रवेश वगळून सन २००६-२००७ या वर्षी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय जातीच्या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत लागू राहतील.

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद भौतिकोपचार,व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे

पदविका	पदवी	पदव्युत्तर पदवी
अभियांत्रिकी	अभियांत्रिकी	एम.बी.ए.
औषधनिर्माण शास्त्र	औषधनिर्माण शास्त्र	एम.सी.ए.
एच.एम.टी.सी.	एच.एम.टी.सी.	--
--	वास्तुशास्त्र	--

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस्.सी. (जैवतंत्रज्ञान)

Scanned by CamScanner

शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीचे सदर धोरण हे सन २००६-२००७ या शैक्षणिक वर्षापासून लागू राहील.

४. ही योजना अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सवलत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू रहाणार नाही.

५. यासाठी होणारा खर्च "२२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण-०३ मागासवर्गीयांचे कल्याण, २७७. शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (०२) (१७) राज्यातील इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने (२२२५-३२३-३) ३४ शिष्यवृत्ती/विद्यावेतन मागणी क्रमांक एन-३." या प्रधान शिर्षाखाली सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या व शासन ज्ञापन, वित्त विभाग क्र. आकनि-११.०७/१३३/अर्थसंकल्प-५, दि. १२/०३/२००७ व आकस्मिक निधी संकेतांक क्र. ८०००-२३४९ अन्वये मंजूर झालेल्या रु. १२.०० कोटी या आकस्मिकता निधीद्वारे प्राप्त झालेल्या रकमेतून केंश फ्लो च्या मर्यादेत भागविण्यात यावा.

"आकस्मिक निधीद्वारे प्राप्त झालेल्या रकमेतून खर्च करताना संचालक, वि.जा.भ.ज. इ.मा.व. पुणे यांनी वित्त विभाग, परिपत्रक क्र.सीएनएफ १०८३/१४०/अर्थसंकल्प ३, दि. २६ एप्रिल, १९८३ व ज्ञापन परिपत्रक वित्त विभाग, क्र. सीएनएफ १०८६/१५३/अर्थसंकल्प ३, दि. २८ ऑगस्ट, १९८३ द्वारे दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे."

६. सदर शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ६२३५/प्रसनिवि दिनांक ०२/०३/२००७ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ११६/०७/व्यय-१४ दिनांक ०७/०३/२००७ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध केला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००७०३१३१०३७३१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रमेश म.उबाळे) २३/३/०७

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति-
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री कृषी व पदुम यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, (विमुक्त जाती, भटक्या जमाती) यांचे खाजगी सचिव

Scanned by CamScanner

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी
विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश
घेणाऱ्या अनुसूचित जाती विमुक्त जाती भटक्या
जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास
प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या
प्रतिपूर्तीबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - डबीसी-२०१२/प्र.क्र.१६४/शिक्षण -१
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ मार्च, २०१२

वाचा:- शासन निर्णय क्रमांक - इबीसी-२०११/प्र.क्र.१६४/शिक्षण-१, दिनांक-३/२/२०१२.

परिच्छेद :- सदर्भाधीन शासन निर्णयान्वये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व [illegible] कृषि, ऊर्जा, वने, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेतील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन [illegible] मध्ये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

२. सदरहू शासन निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी करताना क्षेत्रिय अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्यामुळे सदरहू शासन निर्णयाच्या अनुषंगाने परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे :-

१) शासन निर्णय क्रमांक-इबीसी-२०११/प्र.क्र.१६४/शिक्षण-१, दि. ३ फेब्रुवारी, २०१२ च्या परिच्छेद क्रमांक १६ प्रमाणे यापूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत आहे अशी तरतूद आहे. मात्र काही क्षेत्रिय अधिकाऱ्यांचा असा अर्थ असल्याचे दिसून आले आहे की, दुसऱ्या, तिसऱ्या तथा अंतीम वर्षी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क/परिक्षा शुल्क प्रतीपूर्ती योजनेचा लाभ देता येणार नाही. सदर बाबत असे स्पष्ट करण्यात येते की, यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी दि. ३ फेब्रुवारी, २०१२ च्या परिपत्रकात नमूद अभ्यासक्रमामध्ये प्रवेश

Scanned by CamScanner

ऐतलेला आहे व जे सध्या दुसऱ्या, तिसऱ्या किंवा अंतीम वर्षात आहेत त्यांना शिक्षण शुल्क/परिक्षा प्रतिपूर्ती योजनेचा लाभ अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील.

२) सदर प्रतिपूर्ती महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, कृषि, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय व दुग्धव्यवसाय विभागांच्या अधिपत्याखालील मान्यता प्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाची शिक्षण शुल्क/परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागातील असलेल्या अभ्यासक्रमामध्ये दुग्धव्यवसाय विकास (पदविका) हा अभ्यासक्रमसुध्दा अंतर्भूत आहे.

४) महाराष्ट्र शासनाच्या डी.ओ.ई. व बी. व डी.ओ.ई. अभ्यासक्रमाच्या प्रतिपूर्तीसाठी पूर्वीचेच आदेश लागू राहतील. (सदर अभ्यासक्रमाची प्रतिपूर्ती राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे अनुज्ञेय राहील.)

५) शासन निर्णय क्रमांक-बीसी-२०११/प्र.क्र.४/मावक-४, दि.२/८/२०११ अन्वये [illegible] जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेस केंद्र शासनाने त्यांच्या दि. ३१/[illegible]/२०१० चे [illegible] अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परिक्षा फी लागू आहे. उपरोक्त योजना ज्या अनुसूचित जाती/नवबौध्द विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. २.०० लाखाच्या आतमध्ये आहे त्यांनाच लागू राहील. सदर योजनेमधील येणारे अभ्यासक्रम व त्यांचे गट (ग्रुप) शिष्यवृत्ती व परिक्षा फी/शिक्षण फी [illegible] इत्यादी बाबी ह्या केंद्र शासनाचे मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या परिपत्रकानुसार लागू राहील.

६) केंद्र शासनाचे सामाजिक न्याय व अधिकारीता विभाग, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-११०१४/२१/२००६ बीसी-१, दि.११/८/२०११ अन्वये इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दि. १/७/२०११ पासून गट अ ते ड अभ्यास गटांना सुधारित दराने शिष्यवृत्ती मंजूर केली आहे व उत्पन्न मर्यादा रु. १.०० लक्ष इतकी करण्यात आली आहे. तथापि, राज्य शासनाने अद्याप सुधारित दरास मान्यता दिलेली नाही त्यामुळे सद्यःस्थितीत विजाभज, विमाप, इमाव विद्यार्थ्यांना जुन्या दरानेच शिष्यवृत्ती अदा करण्यात यावी.

Scanned by CamScanner

७) सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतंर्गत अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परिक्षा फी ची प्रतिपूर्ती केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे व केंद्र शासनाच्या परिपत्रकानुसार करावी. तसेच भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी अभ्यासक्रम व त्यांचे गट शिष्यवृत्तीचे व परिक्षा फी/शिक्षण फी इत्यादीचे दर, इत्यादी बाबी केंद्र शासनाच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेप्रमाणे लागु राहील.

८) राज्य शासनाच्या शिक्षण फी/परिक्षा फी प्रतीपूर्ती योजनेतंर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातीच्या वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता पूर्वीप्रमाणेच राहील.

९) राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (डी.एड ,व बी.एड. अभ्यासक्रम वगळुन) शिष्यवृत्ती, परिक्षा फी /शिक्षण फी यांची प्रतिपूर्ती खालीलप्रमाणे राहील :-

अ. क्र.	प्रवर्ग	भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची उत्पन्न मर्यादा	भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती धारकांसाठी		राज्य सरकारच्या शिक्षण फी व परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेसाठी उत्पन्न मर्यादा	राज्य शासनाच्या शिक्षण फी व परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेचे दर
			निर्वाह भत्ता दर (Maintanance Allowance)	शिक्षण फी व परिक्षा फी चे प्रतिपूर्ती दर		
१	२	३	४	५	६	७
१	अनुसूचित जाती व नवबौध्द	रु.२.०० लक्षपर्यंत	१००%	१००%	रु.२.०० लाखाचे पुढे सर्व (उत्पन्न मर्यादा नाही)	१००%
२	विजाभज	रु.१.०० लक्षपर्यंत	१००%	१००%	रु.१.०० लक्ष ते क्रिमीलेअर मर्यादेत (सध्या रु.४.५ लाख)	१००%

Scanned by CamScanner

अ. क्र.	प्रवर्ग	भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची उत्पन्न मर्यादा	भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती धारकांसाठी		राज्य सरकारच्या शिक्षण फी व परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेसाठी उत्पन्न मर्यादा	राज्य शासनाच्या शिक्षण फी व परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेचे दर
			निर्वाह भत्ता दर (Maintanance Allowance)	शिक्षण फी व परिक्षा फी चे प्रतिपूर्ती दर		
१	२	३	४	५	६	७
३	विमाप्र	रु.१.०० लक्षपर्यंत	१००%	१००%	रु.१.०० लक्ष ते क्रिमीलेअर मर्यादेत (सध्या रु.४.५ लाख)	१००%
४	इमाव	रु.१.०० लक्षपर्यंत	१००%	५०%	रु.१.०० लक्ष ते क्रिमीलेअर मर्यादेत (सध्या रु.४.५ लाख)	५०%

वरील मार्गदर्शक सूचना विचारात घेवून, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतर्गत तसेच राज्य शासनाच्या शिक्षण फी/परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती निर्वाह भत्ता, शिक्षण फी व परिक्षा फी चे वाटप करण्यात यावे.

(स.सं.बनके)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री,कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री,सा.न्या.यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

Scanned by CamScanner

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट या करिता नॉन क्रिमीलेयर साठी असलेली उत्पन्न मर्यादा वाढविणे बाबत.

महाराष्ट्र शासन

विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग

शासन निर्णय क्रमांक : सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/विजाभज-१

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४४०००३२
दिनांक: १६ डिसेंबर २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांक : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/मावक -५दि.१३त जानेवारी,२००९

२) शासन निर्णय क्रमांक: सामाजिक न्याय व विशेष सहय्यक विभाग, क्रंमाक :सी.बी.सी-१०/२००८/प्र.क्र.६९७/मावक-५ दि.५दि.२४जून,२०१३

३) शासन निर्णय क्रमांक: मिनीस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लिक ग्रीव्हन्सेस ॲंड पेंन्शास,डिपार्टमेंन्ट ऑफ पर्सोनेल ॲंन्ड ट्रेनिग भारत सरकार यांचे ऑफिस मेमोरेन्डम क्रंमाक ३६.३३/१/२०१३ इएसटी (आरईस), दिनांक१३/९/२०१७

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य लोकसेवा अुनसूचित जाती, जमाती ,निरधि सूचित जमाती, (वि. जा) भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्या साठी आरक्षण अधिनियम २००१(सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) अन्वये महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधिल उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे लागू करण्यात आलेले आहेत.उच्च व उन्नत व्यक्ती/गटासाठी राज्य शासनाने उपरोक्त वाचा येथील क्रमांक १ येथील शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी,२००९ अन्वये कैाटुंबिक उत्पन्न मर्यादा, केंद्रशासनाच्या धर्तीवर रु.४.५० एवढी करण्यात आली होती. तसेच सदर शासन निर्णयान्वये केंद्र शासना कडून या पुढे ज्या-ज्या वेळी उत्पन्न मर्यादत वाढ केली जाईल तीच उत्पन्न मर्यादा यापुढे महाराष्ट्र राज्यातील आरक्षण सोई सवलती करिता उन्नत व प्रगत गट/व्यक्ती करिता लागू राहील असा निर्णय घेण्यात आला आहे. या अनुंषगाने केंद्र शासनाने केलेल्या उत्पन्न मर्यादत केलेल्या वाढीच्या अनुषंगाने उपरोक्त वाचा येथील क्रंमाक २ शासन निर्णयान्वये सदर उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाख वरुन रुपये ६.०० एवढी वाढ केलेली आहे. आता केंद्रशासनाने त्याच्या उपरोक्त वाचा येथील क्रंमाक ३ येथील ऑफीस मेमोरेन्डम अन्वये ६.०० लाख उत्पन्न मर्यादेत वाढ करुन सदर उत्पन्न मर्यादा रुपये ८.००लाख इतकी केली आहे. सदर उत्पन्न मर्यादेत केलेली वाढ राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग,इतर मागासवर्ग या मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/ गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती...

Scanned by CamScanner

शासन निर्णय :-

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती,विशेष मागासप्रवर्ग या मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट या करिता नॉनक्रिमीलेयरसाठी असलेली उत्पन्न मर्यादाही रु ६.०० लक्ष वरुन रुपये ८.००लक्ष इतकी वाढ करण्यास या द्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. ज्याचे उत्पन्न मागील सलग तीन आर्थिक वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रुपये ८.०० लाखापेक्षा जास्त आहे. अशाना आरक्षणाचा लाभ मिळणार नाही .

२) तसेच केंद्र शासनाने इतर मागास प्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी दिनांक १३/०९/२०१७ ऑफीस मेमोरन्डम नुसार उत्पन्न मर्यादेत वाढ करुन ती रुपये ८.००लाख वार्षिक करण्यात आलेली आहे.(सदर ऑफीस मेमोरन्डमची प्रत केंद्र शासनाच्या मिनिस्ट्रीऑफ मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल पब्लिक ग्रीव्हन्सेस ॲड पेन्शस, डिपार्टमेन्ट ऑफ पर्सोनल ॲन्ड ट्रेंनिग भारत सरकार च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे).केंद्र शासनाने अखत्यारीतील आरक्षण व सेवा विषयक लाभासाठी केंद्र शासनाने महाराष्ट्राशी संबधित जी इतर मागासवर्गीयांची यादी निशिचीत केलेली आहे त्यांना रु.८.०० लाख एवढी वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

३) सदर आदेश दिनांक १ सप्टेंबर, २०१७ पासून अमंलात राहतील.

४) सदर शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक:१९३/२०१७/ व्यय-१४,दि ३०/११/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१७१२१६१५१०४२५०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb82745 7be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489 ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2017.12.16 14:59:23 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई

Scanned by CamScanner

सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व
विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन निर्णय क्र. सीबीसी-२०१९/प्र.क्र.१०८/मावक
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, २०१९.

वाचा :- १) सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.६२ , दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८.
२) सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.०७ , दिनांक ३ जुलै, २०१९.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.२६४/आस्था-१, दिनांक २५ जून, २०१९.

प्रस्तावना:

वाचा क्र. १ येथे नमूद दि. ३० नोव्हेंबर २०१८ रोजीच्या अधिनियमाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग नव्याने घोषित करण्यात आला असून त्यामध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे.

वाचा क्र.२ येथे नमूद सन २०१९ चा अधिनियम क्र. ७ दि. ३ जुलै, २०१९ अन्वये वाचा क्र. १ येथे नमूद अधिनियमातील कलम ४ क येथे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी विनिर्दिष्ट आरक्षण १२ % तर कलम ४ ख येथे विनिर्दिष्ट आरक्षण १३ % एवढे विहित करण्यात आले आहे.

वाचा क्र. ३ येथे नमूद सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. २५ जुन २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्ग कल्याण हे विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागास हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

मा. मंत्री महसुल तथा अध्यक्ष मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्याना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करणेबाबत दि. २६.६.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता विधानभवन, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर योजना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या

मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने खालीलप्रमाणे शासननिर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दि. २५.६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण व SEBC प्रवर्ग कल्याण हा विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडे सोपविण्यात आलेला आहे. SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) लागू करण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यास (उदाहरणार्थ मा. मंत्रीमंडळाची मान्यता/लेखाशिर्ष/शासन निर्णय/अर्थसंकल्प तरतूद उपलब्ध करुन घेणे इ.) किमान ६ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. ही बाब तसेच विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडील अपुरे मनुष्यबळ, आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने लागू होणाऱ्या आदर्श आचारसंहितेमुळे विभागाकडे उपलब्ध होणारा अल्प कालावधी विचारात घेऊन SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा पहिला हप्ता संबंधित प्रशासकीय विभागानी सदर दोन्ही योजनांसाठी कार्यान्वित लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या वित्तीय तरतुदीतून अदा करावा.

३. उक्त नमूद दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा दुसरा हप्ता अदा करण्याच्या कालावधीपर्यंत विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाची याबाबत आवश्यकती प्रशासकीय कार्यवाही पुर्ण झाली तरच शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता देण्याची कार्यवाही विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत करण्यात येईल.

४. त्याचप्रमाणे सदर दोन्ही योजनांचा लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यासाठी आजमितीस जी यंत्रणा व कार्यपध्दती, शासननिर्णय, पात्रतेच्या अटी शर्ती अस्तित्वात आहे त्यात कोणताही बदल न करता प्रचलित यंत्रणा व कार्यपध्दतीद्वारे राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्यात यावा.

५. महाडिबीटी पोर्टलवर राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही देखील उच्च प्राधान्याने करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याचा संगणक साकेतांक क्रमांक २०१९०७१११२१६५००१२२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Vithalrao Weladi

Digitally signed by Vijay Vithalrao Weladi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c33d11360090dc60a00f603b2d1b16bd83f0256338774a947f737fede7af039, serialNumber=1e395c154c970776fc511564 1f8d6663d6a765cfcf30c8d1f594706468740b6d, cn=Vijay Vithalrao Weladi
Date: 2019.07.11 13:24:10 +05'30'

(वि.वि.वेलादी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मंत्री/मा. राज्यमंत्री, (सर्व) मंत्रालय, मुंबई.मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव (पशु संवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय) विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.
१४. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई

१७.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१९.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई
२०.संचालक, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.
२१.सर्व विभागीय आयुक्त
२२.सर्व जिल्हाधिकारी

आपण सदर योजना सर्व संबंधित विभागांकडून काटेकोरपणे राबविल्या जाईल यासाठी आवश्यकती कार्यवाही करावी.

२३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
२४.समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
२५.अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जातपडताळणी समिती (सर्व)
२६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२७.सर्व उपविभागीय अधिकारी (महसुल) तथा उपविभागीय दंडाधिकारी
२८. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी
२९.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई
३०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा , मुंबई
३१.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- नागपूर
३२.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- नागपूर
३३.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- औरंगाबाद
३४.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- औरंगाबाद
३५. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३७. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३८. संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३९.संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४०.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
४१.व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे
४२.मंत्री, (महसूल), महसूल व वन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४३.मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृटया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: ७ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ: १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/ तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१६

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/ तांशि-४, दिनांक १३/१०/२०१६

३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक १५/०४/२०१७

४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक २१/०६/२०१७

५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक ११/०८/२०१७

६) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय, क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र.१३/शिक्षण, दि.२१/८/२०१७

७) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक १३/०९/२०१७

८) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) परिपत्रक क्रमांक उशिसं/२००४-०५/ ईबीसी/१४जी, दिनांक १७.२.२००५

प्रस्तावना :

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वरील संदर्भ क्र.२, ४ व ५ येथील शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या खालील निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विहित अटी व शर्तींनुसार शासकीय व शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठांसह) व खाजगी विनाअनुदानित (खाजगी

अभिमत/स्वयं अर्थ सहाय्य विद्यापीठे वगळून) महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमध्ये शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रिभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना (व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थी वगळून) शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते.

अ.क्र	विभागाचे नांव	अभ्यासक्रम
१.	उच्च व तंत्र शिक्षण विभाग	**पदविका:** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी **पदवी:** अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र. **पदव्युत्तर पदवी:** मास्टर ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट / मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मास्टर ऑफ कॉम्प्युटर अप्लिकेशन
२.	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग	**पदवी:**एम.बी.बी.एस.,बी.डी.एस.,बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस.,बी.यु.एम.एस.,बी.पी.टी.एच., बी.ओ.टी.एच. व नर्सिंग
३.	कृषी विभाग	**पदविका :**कृषी **पदवी :** कृषी व संलग्न विषय, फलोत्पादन, जैव तंत्रज्ञान, अन्न तंत्रज्ञान, शेती व्यवस्थापन **पदव्युत्तर पदवी :** कृषी व संलग्न विषय
४.	पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग	**पदविका:** दुग्धव्यवसाय व्यवस्थापन, पशुसंवर्धन व्यवस्थापन. **पदवी:** प्राणिशास्त्र व पशुसंवर्धन, दुग्धतंत्रज्ञान, मत्स्यविज्ञान **पदव्युत्तर पदवी:** प्राणिशास्त्र

२) वरील पैकी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील एम.बी.बी.एस. (बॅचलर ऑफ मेडिसिन अँड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस. (बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी) या अभ्यासक्रमांसाठी शासकीय, शासन अनुदानित आणि खाजगी विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थ सहाय्य विद्यापीठे वगळून) महाविद्यालयांमध्ये शासनाच्या सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रिभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे प्रवेश घेणाऱ्या व सध्या विविध शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी (व्यवस्थापन कोटयातील प्रवेश वगळून) ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना (व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थी वगळून) संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते.

तसेच या वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख पेक्षा जास्त व रु. ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना (व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थी वगळून) त्यांच्या प्रवेशित अभ्यासक्रमासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे निश्चित केलेले शैक्षणिक शुल्क महाविद्यालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यन्तची रक्कम ही वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधित बँकेस अदा करण्यात येते.

३) शासनाने वरील संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये उपरोक्त नमूद "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारी लाभाची रक्कम ही थेट स्वरुपात लाभार्थ्याच्या आधारसंलग्नीत बँक खात्यात संबंधित प्रशासकीय विभागाकडून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून जमा करण्याचा देखील शासनाने यापूर्वी निर्णय घेतला आहे.

४) शासनाने वरील संदर्भ क्र.६ येथील दिनांक २१/०८/२०१७ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या यादीतील विविध व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी उपरोक्त प्रचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकरीता या सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील नमूद अभ्यासक्रमांना सध्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयासोबत जोडलेल्या यादीतील काही अभ्यासक्रम सद्य:स्थितीत राज्यातील अकृषी विद्यापीठात अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले असून याची यादी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "क" मध्ये नमूद केली आहे. याशिवाय संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केलेले जे अभ्यासक्रम सध्या विविध महाविद्यालयात कार्यान्वित आहेत, परंतु यापैकी ज्या अभ्यासक्रमांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याकरीता असलेल्या प्रचलित योजनेंतर्गत लाभ देण्यात येत नाही, अशा अभ्यासक्रमांची यादी परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केली आहे. सबब, प्रचलित योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याना सध्या ज्या अभ्यासक्रमांसाठी लाभ देण्यात येतो अशा अभ्यासक्रमांशिवाय वरील परिशिष्ट "ब" येथील अभ्यासक्रमांसाठी देखील या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लाभ देण्यासाठी या अभ्यासक्रमांचाही नव्याने प्रचलित योजनेत समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

५) तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय, अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील-विनाअनुदानित) महाविद्यालयांमधील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये २.५० लाख इतकी केली आहे. सध्या शासकीय, अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील-विना अनुदानित) महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमासाठी सदरची उत्पन्न मर्यादा असणाऱ्या या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारण्यात येत नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना अप्रत्यक्षरित्या शासनाकडून शिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते. तथापि, सदरची वरील वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये २.५० लाख वरुन रुपये ६.०० लाख इतकी करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

६) तसेच सध्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील केवळ शासकीय व अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील-विना अनुदानित) महाविद्यालयातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीच प्रचलित शिष्यवृत्ती मर्यादीत असून त्याची व्याप्ती वाढवून शासकीय/अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील - विना अनुदानित) संस्थांशिवाय कायम विना अनुदानित महाविद्यालयातील अभ्यासक्रमांकरीताही लागू करण्याबाबत शासन स्तरावर विचार सुरु होता.

७) याशिवाय नव्याने समाविष्ट होणाऱ्या अभ्यासक्रमांपैकी उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासकीय/अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील-विना अनुदानित) महाविद्यालये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांमधील अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या १०० टक्के शिष्यवृत्ती देण्याची बाब विचाराधीन होती. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासकीय / अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे त्यांना प्रचलित पध्दतीनुसार शिक्षण शुल्काच्या १०० टक्के व ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त व रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, त्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के शिष्यवृत्ती देण्याची बाब विचाराधीन होती. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील कायम विना अनुदानित महाविद्यालयांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, त्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के शिष्यवृत्ती लागू करणे देखील शासनाच्या विचाराधीन होते.

८) वरील संदर्भ क्र. ८ येथील परिपत्रकातील तरतूदीनुसार सध्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती देण्यात येत असल्याने या संस्थांना रु. १७०/- (रु. १२५/- प्रयोगशाळा शुल्क व रु. ४५/- इतर शुल्क) प्रति विद्यार्थी इतकी प्रतिपूर्ती करण्यात येते. तसेच टप्पा अनुदानावरील उपरोक्त दराने प्रतिपूर्तीशिवाय पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रति विद्यार्थी अनुक्रमे रु. ४००/- व रु. ८००/- प्रति विद्यार्थी इतकी प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येते. परंतु वरील परिच्छेदांमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित सुधारित दराने शिष्यवृत्ती विद्यार्थ्यास थेट लाभ स्वरुपात हस्तांतरण (DBT) द्वारे यापुढे देण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे अनुदानित/टप्पा अनुदानावरील संस्थांना सध्या देण्यात येणारी प्रतिपूर्ती बंद करण्याचे विचाराधीन होते.

९) तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील सर्व विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संबंधित विद्यापीठ, तंत्र शिक्षण मंडळ, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, इत्यादींकडून आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यन्तचे व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता १०० टक्के परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची बाब विचाराधीन होती.

१०) शासनाने वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अल्प भूधारक शेतकरी आणि नोंदणीकृत मजूरांच्या पाल्यांकरीता डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून लागू केली आहे. तथापि, नव्याने वरीलप्रमाणे समाविष्ट होणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचा देखील समावेश हा डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत करण्याचा व त्यानुसार या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अल्प भूधारक शेतकरी आणि नोंदणीकृत मजूरांच्या पाल्यांना डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून देण्याचे विचाराधीन होते.

११) तसेच ज्या विद्यार्थ्यांचे पाल्य अल्प भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांचे कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु.१.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रचलित व नव्याने समाविष्ट करण्यात येणाऱ्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसह बिगर व्यावसायिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी/ १२ वी) अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्षातील १० महिन्याकरीता शिक्षणासाठी निर्वाह भत्ता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

१२) यानुसार मंत्रिमंडळाने दिनांक १०/०८/२०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार वित्त विभागाच्या सहमतीने सदर शासन निर्णय निर्गमित करण्याचे प्रस्तावित होते.

शासन निर्णय:

प्रचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकरीता या सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील नमूद अभ्यासक्रमांना सध्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयासोबत जोडलेल्या यादीतील काही अभ्यासक्रम सद्य:स्थितीत अकृषी विद्यापीठात अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले असून याची यादी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "क" मध्ये नमूद केली आहे. याशिवाय संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केलेले जे अभ्यासक्रम सध्या विविध महाविद्यालये/विद्यापीठात कार्यान्वित आहेत, परंतु यापैकी ज्या अभ्यासक्रमांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याकरीता असलेल्या प्रचलित योजनेंतर्गत लाभ देण्यात येत नाही, अशा अभ्यासक्रमांची यादी परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केली आहे. सबब, प्रचलित योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याना सध्या ज्या अभ्यासक्रमांसाठी लाभ देण्यात येतो अशा अभ्यासक्रमांशिवाय परिशिष्ट "ब" येथील अभ्यासक्रमांचाही नव्याने प्रचलित योजनेत समावेश करण्यात येत आहे.

२) या विभागांतर्गत येणाऱ्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" मधील अभ्यासक्रमांसाठी-

(अ) सध्या केवळ शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विनाअनुदानित) महाविद्यालयातील व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांमधील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीच मर्यादित असलेल्या शिष्यवृत्तीची व्याप्ती वाढवून शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विनाअनुदानित) महाविद्यालये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांशिवाय, कायम विना अनुदानित महाविद्यालयातील अभ्यासक्रमांकरीताही (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) सदर शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येत आहे.

(ब) शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान -विनाअनुदानित) कायम विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांमधील (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल

घटकातील विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्याच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रु. २.५० लाख वरुन रु. ६.०० लाख करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(क) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील वरील परिच्छेद-१ येथे नमूद केल्याप्रमाणे प्रचलित तसेच नव्याने समाविष्ट होणा-या अभ्यासक्रमांकरीता खालीलप्रमाणे लाभ देण्यास मान्यता देण्यात येत आहे -

(१) शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विनाअनुदानित)/ कायम विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांमध्ये (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या १०० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देय राहील.

(२) मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासकीय/ अशासकीय अनुदानित अभ्यासक्रमांना शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार व व्यवस्थापन कोटा असल्यास या कोटयातील प्रवेश वगळून उर्वरित जागांवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा कमी आहे, त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या १०० टक्के शिष्यवृत्ती देय राहील. तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त व रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देय राहील.

(३) तसेच मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विनाअनुदानित) व कायम विना अनुदानित अभ्यासक्रमांना शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, त्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देय राहील.

(४) उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत अभ्यासक्रमांकरीता या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती पुढीलप्रमाणे देय राहील :-

उत्पन्न मर्यादा	शुल्क प्रकार	अभ्यासक्रम			
		शासकीय	अशासकीय अनुदानित	अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानित - विनाअनुदानित)	कायम विनाअनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रम					
रु.२.५० लाख पर्यंत	शिक्षण शुल्क	१००%	१००%	५०%	५०%
रु.२.५० लाख ते रु.६ लाखापर्यंत	शिक्षण शुल्क	५०%	५०%	५०%	५०%
बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम					
रु.६ लाखापर्यंत	शिक्षण शुल्क	१००%	१००%	१००%	१००%

३) उपरोक्तप्रमाणे उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीता प्रस्तावित सुधारित दराने शिष्यवृत्ती विद्यार्थ्यास यापुढे थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे देण्यात येणार असल्याने यापूर्वीची वरील संदर्भ क्र.८ येथील परिपत्रकानुसार प्रचलित उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शिष्यवृत्ती योजना अधिक्रमित करण्यात येत असून शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (विनाअनुदानित - टप्पा अनुदान) महाविद्यालयांना रु. १२५/- प्रयोगशाळा शुल्क (विज्ञान विधी शाखेसाठी) व रु. ४५/- (ग्रंथालय शुल्क रु.१०/-, जिमखाना शुल्क रु.२०/- व इतर शुल्क रु.१५/-) प्रति ईबीसी पात्रताधारक विद्यार्थ्याकरीता देण्यात येणारी प्रतिपूर्ती यापुढे देय राहणार नाही. तसेच या प्रतिपूर्तीशिवाय अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान-विनाअनुदानित) महाविद्यालयांना प्रति ईबीसी पात्रताधारक विद्यार्थ्याकरीता पदवी (रु.४००/-) व पदव्युत्तर पदवी (रु.८००/-) देण्यात येणारी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्तीही यापुढे देय राहणार नाही.

४) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रांमधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (व्यवस्थापन कोटयातील / संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील

विद्यार्थ्यांकडून शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल. तसेच या संचालनालयाच्या अखत्यारितील बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाने विहित केलेल्या प्रवेश प्रक्रीयेचा अवलंब करुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून सक्षम प्राधिकरणाने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या १०० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल.

५) याचप्रमाणे अन्य प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित, अंशत: अनुदानित (अनुदानाच्या टप्प्यावरील) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रांमधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी एम.बी.बी.एस. (बॅचलर ऑफ मेडिसीन अँड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस. (बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी) हे अभ्यासक्रम वगळून उर्वरित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (व्यवस्थापन कोटयातील संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल. तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासनाने विहित केलेल्या प्रवेश प्रक्रीयेचा अवलंब करुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या १०० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल.

६) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित, अंशत: अनुदानित (अनुदानाच्या टप्प्यावरील) व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) मान्यता प्राप्त एम.बी.बी.एस. (बॅचलर ऑफ मेडिसीन अँड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस. (बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी) या अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (व्यवस्थापन कोटयातील संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त

व रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सक्षम शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे निश्चित केल्याप्रमाणे शिक्षण शुल्क महाविद्यालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यंतची रक्कम ही अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधित बँकेस वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयानुसार अदा करण्यात येईल.

७) वरीलप्रमाणे शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा देण्यात येणारा लाभ हा शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या निवडक अभ्यासक्रमांसाठीच मर्यादित असेल.

